भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/१६५**
**डीपीएसएस.को.सीएचडी.क्र.२८४ / ०३.०६.०३ / २०१२-१३** **ऑगस्ट १३, २०१२**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी**
**सर्व अनुसूचित वाणिज्य बँका आरबीबीज् सहित**
**नागरी कॉपरेटीव्ह बँक / स्टेट कॉपरेटीव्ह बँक/ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी**

महोदया/महोदय,

**<u>स्थानिक चेक्सच्या समाशोधनामधील विलंबासाठी भरपाईची अट</u>**

आपणास माहितच असेल की, बँकांनी, त्यांच्या चेक गोळा करण्याच्या धोरणांमध्ये (सीसीपी), स्थानिक तसेच बाहेरगावच्या चेक्सच्या वसुलीबाबत, विलंबाने दिलेल्या क्रेडिटच्या भरपाईसह, विशिष्ट कालावधी विहित करणे आवश्यक आहे. तथापि, चेक गोळा करण्याची धोरणे (सीसीपी) आणि भरपाई धोरणे ह्याबाबतच्या काही बँकांची धोरणे पाहता, स्थानिक चेक्सच्या वसुलीमध्ये विलंब झाल्यास त्याची भरपाई देण्याबाबत कोणताही उल्लेख केलेला दिसत नाही. स्थानिक चेक्सच्या बाबतीत, सीसीपीमध्ये दिलेल्या कालावधी पलिकडेही विलंब होऊन, कोणतीही भरपाई न देता, ग्राहकांच्या खात्यात क्रेडिट केल्या जाण्याच्या अनेक घटना नजरेस आणल्या गेल्या आहेत.

(२) ह्याबाबत, परिपत्रक डीपीएसएस.सीओ (सीएचडी) क्र. ८७३/०३.०९.०१/२००८-०९ दि. नोव्हेंबर २४, २००८ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. ह्या परिपत्रकानुसार, बँकांनी, त्यांच्या सीसीपीमध्ये, स्थानिक चेक्ससह, सर्व चेक्सचा वसुलीबाबत लागणारा कालावधी विहित करणे आवश्यक आहे. ह्या परिपत्रकाच्या परिच्छेद ४(२) अनुसार, स्थानिक चेक्सच्या बाबतीत, संबंधित रिटर्न क्लियरिंग संपल्यावर, बँका त्यांच्या ग्राहकांच्या खात्यात ताबडतोब शॅडो क्रेडिट दाखवतील आणि कोणत्याही परिस्थितीत, त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त पुढील दिवशी व्यवहार सुरु झाल्यावर एक तासाच्या आत ग्राहकाला नेहमीची सुरक्षा ठेवून, निकासी करु दिली जाईल.

(३) वरील गोष्टींचा विचार करता, स्थानिक चेक्स गोळा करण्यातील विलंबासाठी देय भरपाई देखील समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या सीसीपीची पुनर्रचना करावी असे बँकांना सांगण्यात येत आहे. स्थानिक चेक्सच्या वसुलीमधील विलंबाबाबत सीसीपीमध्ये कोणताही दर विहित केलेला नसल्यास, संबंधित विलंब-कालासाठी बचत खात्याच्या व्याजदराने भरपाई दिली जावी.

(४) बाहेरगावच्या चेक्स बाबत विलंबाने क्रेडिट केले जाण्यासाठी वसुलीचा कालावधी व भरपाई ह्या संबंधात, आमच्या दि. २४ नोव्हेंबर २००८ च्या परिपत्रकातील परिच्छेद ४(३) मधील सूचनात कोणताही बदल केलेला नाही.

(५) अधिक चांगली ग्राहक सेवा व माहिती प्रसारणासाठी, बँकांनी, त्यांच्या सुधारित सीसीपीला, शाखांमधील सूचना फलक तसेच त्यांच्या वेबसाईटवर प्रसिध्दी द्यावी. अशा सुधारित सीसीपीची एक प्रत आमच्याकडेही पाठविण्यात यावी.

(६) वरील सूचना, पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स अधिनियम, २००७ (२००७ चा ५१) च्या कलम १८ खाली देण्यात आल्या आहेत.

(७) कृपया पोच द्यावी व अनुपालनाची खात्री करावी

आपला विश्वासु,

(विजय चुघ)
मुख्य महाव्यवस्थापक

प्रदान विभाग आणि सेटलमेंट विभाग, केंद्रीय कार्यालय, १४ वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, शहिद भगत सिंग मार्ग, मुंबई - ४००००१ दुरध्वनी :(९१-२२) २२६६ ५३३६; फॅक्सः (९१-२२) २२६९१५५७ ईमेल : helpdpss@rbi.org.in